# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी/ईमेल/२०२२ दिनांक १४ जून, २०२२

जळगांव,दि.१४(प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्र व माहितीशास्त्रज्ञ विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी.लिब (BLISc) व एम.लिब (MLISc) हे दोनही एक-एक वर्षीय अभ्यासक्रम सुरु करण्यात येत आहेत.

सदर अभ्यासक्रम सुरु करण्यास विद्यापीठ प्राधिकरणाने मान्यता दिलेली असून बी.लिब या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही विद्यापीठाचा व कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे गरजेचे आहे तर एम.लिब या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही विद्यापीठातून बी.लिब पर्यंतचे शिक्षण पूर्ण झालेले हवे.

बी.लिब या वर्गाची प्रवेश क्षमता ३० विद्यार्थी एवढी आहे तर एम.लिब या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता २० विद्यार्थी एवढी आहे. दोनही अभ्यासक्रमांची प्रवेश फी रुपये ७५००/- मात्र एवढी ठेवण्यात आलेली असून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाच्या योजनांप्रमाणे लाभ देय राहतील. वरील प्रमाणे नमूद दोनही अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना विद्यापीठ ग्रंथालय, महाविद्यालयीन ग्रंथालय, सार्वजनिक ग्रंथालय व अन्य् शासकीय ग्रंथालये तसेच विविध संस्थांमध्ये नोकरीची संधी सहजच मिळू शकते. सदर कोर्सच्या प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यापीठाचे www.nmu.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर अथवा अधिक माहितीसाठी (०२५७) २२५७४०१, ४०२,४०४ या फोन नंबरवर किंवा विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्र,कबचौउमवि, जळगाव येथे प्रत्यक्ष् संपर्क करावा व प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन संचालकांकडून करण्यात आले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात जळगाव, धुळे व नंदुरबार आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी